**<u>ठळक बातम्या</u>**

- दिवाळीनिमित्त अयोध्येत शरयू तिरावर आज २६ लाखापेक्षा जास्त दीप उजळणार, भगवान श्रीरामाच्या आगमनसाठी आयोध्यानगरी सज्ज

- चांद्रयान-२ नं सूर्याच्या पृष्ठभागावरून उत्सर्जित होणाऱ्या 'कोरोनल मास इजेक्शन' चा चंद्रावर पडणारा प्रभाव प्रथमच टिपला असून, हे विज्ञान क्षेत्रातलं ऐतिहासिक यश असल्याची इस्त्रोची माहिती

- अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत आणि कर्जमाफी देण्याच्या मागणीसाठी काँग्रेसचं उद्या राज्यभरात आंदोलन

**आणि**

- तीन सामन्यांच्या एक दिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचं ऑस्ट्रेलियासमोर डकवर्थ लुईस नियमाप्रमाणे १३१ धावांचं आव्हान

**<><><><><>**

भगवान श्री राम यांच्या आगमनाचा सोहळा साजरा करण्यासाठी उत्तरप्रदेशात शरयू नदीच्या किनाऱ्यावर आज संध्याकाळी भव्य दीपोत्सव साजरा होत असून, यासाठी अयोध्या नगरी सजली आहे. राम की पौडी इथल्या ५६ घाटांवर आज २६ लाखांपेक्षा जास्त दिवे प्रज्वलित केले जातील. या दिव्यांच्या प्रकाशात अयोध्या नगरीची अध्यात्मिक आणि सांस्कृतिक प्रतिमा जागतिक व्यासपीठावर उजळून निघेल. आज संध्याकाळी स्थानिक प्रशासनानं आयोजित केलेली भव्य शरयू आरती या कार्यक्रमाच्या दिमाखात आणखी भर घालेल.

दरम्यान, काल दिल्लीत प्रथमच अयोध्येच्या धर्तीवर दीपोत्सव साजरा करण्यात आला. कर्तव्यपथावर मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी या उत्सवाचं उद्घाटन केलं. हा केवळ दीपोत्सव नाही, तर एका नव्या जाणिवेचा उत्सव असल्याचं त्या म्हणाल्या.

हा दीपोत्सव म्हणजे आस्था आणि आधुनिकतेचा संगम असल्याचंही त्यांनी सांगितलं. या दीपोत्सवात दीड लाखापेक्षा जास्त दिवे प्रज्वलित करण्यात आले.

**<><><><><>**

दिवाळीनिमित्त महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळीचा सण अंधारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा आणि नकारात्मकतेवर सकारात्मकतेच्या विजयाचं प्रतीक असल्याचं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. तसंच या निमित्त सर्वांना स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार करण्याचं आवाहन राज्यपालांनी केलं आहे. पर्यावरण रक्षण, नैसर्गिक संसाधनांचा आदर आणि नैसर्गिक शेती यासारख्या शाश्वत जीवन मूल्यांचा अवलंब करून उज्ज्वल, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत सहभागी होण्याचं आवाहनही राज्यपालांनी आपल्या संदेशात केलं आहे.

**<><><><><>**

नुकत्याच लागू झालेल्या जीएसटी सुधारणांमुळे सणासुदीच्या दिवसांमध्ये खरेदीच्या उत्साहात भर पडली असून, यंदा ग्राहकोपयोगी वस्तूंची विक्रमी विक्री होत आहे. धनत्रयोदशीच्या दिवशी काल देशभरात १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त एकूण व्यापार झाल्याचा अंदाज असून, गेल्या काही वर्षांमधला हा सर्वात उत्साहाचा हंगाम ठरला आहे. यंदा धनत्रयोदशीच्या दिवशी सोन्या-चांदी च्या वस्तूंबरोबर वाहन खरेदीमध्येही तेजी दिसून आली. सोन्याच्या नाण्यांना सर्वाधिक मागणी असून, हॉलमार्क-प्रमाणित हलक्या दागिन्यांनाही ग्राहकांची पसंती मिळत आहे.

**<><><><><>**

नांदेडमध्ये उद्यापासून तीन दिवस दिवाळी पहाट कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल यांच्या गायनाचा कार्यक्रम यात होईल तसंच अंकिता जोशी यांचा शास्त्रीय संगीतावर आधारित स्वर सरिता हा कार्यक्रमही होणार आहे.

<><><><><>

चांद्रयान-२ नं आपल्या वैज्ञानिक उपकरणांच्या साहाय्यानं सूर्याच्या पृष्ठभागावरून उत्सर्जित होणाऱ्या ‘कोरोनल मास इजेक्शन’ चा चंद्रावर पडणारा प्रभाव पहिल्यांदाच टिपला असून, हे विज्ञान क्षेत्रातलं ऐतिहासिक यश असल्याचं इस्त्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं म्हटलं आहे.

चांद्रयान-२ नं टिपलेल्या नोंदींमुळे चंद्राचं बाह्य क्षेत्र, चंद्रावरचं विरळ वातावरण आणि त्याच्या पृष्ठभागावर होणारा अवकाशातल्या हवामानाचा प्रभाव समजून घ्यायला सहाय्य होईल, असं बंगळुरू इथल्या इस्त्रोच्या मुख्यालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. चांद्रयान-२ चं निरीक्षण चंद्रावरच्या वातावरणाबाबत वैज्ञानिक समज वाढवेल, तसंच भविष्यातल्या चांद्र मोहिमा आणि चंद्रावर मानवाच्या अधिवासाच्या योजनेत महत्वाची भूमिका बजावेल असं यात म्हटलं आहे. २२ जुलै २०१९ रोजी श्रीहरीकोटा इथून प्रक्षेपित करण्यात आलेल्या चांद्रयान-२ नं, २० ऑगस्ट २०१९ रोजी, चंद्राभोवतालच्या लंबवर्तुळाकार कक्षेत यशस्वीपणे प्रवेश केला होता. ७ सप्टेंबर २०१९ रोजी लँडिंगच्या प्रयत्नादरम्यान यानाचा विक्रम लँडरशी संपर्क तुटला होता, तरी ते पूर्णपणे कार्यरत असून ते चंद्राच्या कक्षेत कार्यरत असल्याचं इस्त्रोनं म्हटलं आहे.

<><><><><>

मुंबईतल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातल्या पर्यावरणपूरक ई- बग्गी सेवेला आज प्रारंभ झाला. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी दूरस्थ पद्धतीने याचं उद्घाटन केलं. या उपक्रमामुळे उद्यानात प्रदूषणमुक्त पर्यटनाचा आनंद मिळेल, आणि पर्यटनाला चालना मिळेल असं गोयल यावेळी म्हणाले. ही ई-बग्गी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या मुख्य प्रवेशदारापासून कान्हेरी गुंफांपर्यंत धावेल. त्यामुळे प्रवास जलद आणि सुखकर होईल, अशी अपेक्षा आहे. वनमंत्री गणेश नाईक, यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><>

राज्यातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत करावी तसंच कर्जमाफी करावी या मागणीसाठी काँग्रेस उद्या राज्यभर पिठलं भाकरी आंदोलन करणार आहे. शेतकऱ्यांवर मोठं संकट ओढवल्यामुळे त्यांना भरीव पॅकेज आणि कर्जमाफी देण्याची आवश्यकता होती. मात्र, सरकारने जाहीर केलेलं पॅकेज पुरेसं नसून तेही अद्याप शेतकऱ्यांना मिळालं नसल्याची टीका काँग्रेसने केली. राज्यातले सर्व जिल्हे, तालुका आणि गावागावात हे आंदोलन केलं जाणार असल्याची माहिती प्रदेश काँग्रेसने दिली आहे.

<><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीतला जागावाटपाचा तिढा तेजस्वी यादव यांनी सोडवावा असं आवाहन काँग्रेसनं केलं आहे. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत शुक्रवारी संपली. मात्र इंडिया आघाडीचं जागावाटपाचं सूत्र जाहीर झालं नाही. त्यामुळे पहिल्या टप्प्यात अनेक मतदारसंघात काँग्रेस, राजद आणि डाव्या पक्षांचे उमेदवार एकमेकांविरोधात लढत आहेत. दुसऱ्या टप्प्यातल्या जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपत आहे. या टप्प्यातल्या कुटुंबा मतदारसंघात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश राम यांच्याविरोधात उमेदवार जाहीर करण्याचा निर्णय राजदने घेतल्यामुळे संबंध अधिकच ताणले गेले आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्षानेही अनेक ठिकाणी काँग्रेसविरोधात उमेदवार उभे केले असून झारखंड मुक्ती मोर्चाने सहा ठिकाणी इंडिया आघाडीतल्या घटक पक्षांच्या उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

वाशिम इथं समृद्धी महामार्गावर  काल झालेल्या अपघातात दोन विदेशी पर्यटकांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले आहेत. हे पर्यटक म्यानमारहून

जगन्नाथ पुरीच्या दर्शनासाठी आले होते. वाहन चालकाचं नियंत्रण सुटूून वाहन महामार्गाच्या कठड्यावर आदळून हा अपघात झाला. जखमींवर वाशिम जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

<><><><>

चंद्रपूर जिल्ह्यातल्या सावली तालुक्यातल्या हिरापूर इथं कालव्यात दोन जण वाहून गेले. चारा आणण्यासाठी काल एका कुटुंबातील आजोबा आणि नातू आसोलमेंढा तलावाच्या परिसरात गेले होते. तेव्हा झाडावर चढून पाला तोडताना नातवाचा तोल गेला आणि तो कालव्यात पडला. नातवाला वाचवण्यासाठी आजोबांनी कालव्यात उडी घेतली, मात्र पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने दोघेही वाहून गेले.

<><><><>

गडचिरोली इथं आज आदी कर्मयोगी अभियानाला सुरुवात झाली. या अभियानांतर्गत जिल्ह्यातल्या १२ तालुक्यांमध्ये ४४१ गावांचा समूह तयार करण्यात आला. तसंच गावांपर्यंत योजना पोहचण्यासाठी प्रशिक्षक तयार करण्यात आले. आतापर्यंत ५५३ ग्रामसभा घेण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात ५२२ मोबाईल मनोरे उभारण्यात आले आहेत.

<><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलियातल्या तीन सामन्यांच्या एक दिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी डकवर्थ लुईस नियमानुसार १३१ धावांचं आव्हान ठेवण्यात आलं आहे. सामन्यात पावसाचा सतत व्यत्यय आल्यानं सामना २६ षटकांचा करण्यात आला होता, भारतीय संघ २६ षटकांत १३६ धावाच करू शकला. त्याआधी ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. पण भारताचा एकही फलंदाज फारशी चमक दाखवू शकला नाही. सलामीवर रोहित शर्मा ८ तर कर्णधार शुभमन गिल १० धावा करून झटपट बाद झाले. तर विराट कोहलीला भोपळाही फोडता आला नाही.

भारताकडून के एल राहुलनं सर्वाधिक ३८ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या मिशेन ओवेन, मॅथ्यू कुहेनमन आणि जोश हेजलवूड यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या **एक** बाद **दहा** धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज इंदुर इथं यजमान भारत आणि इंग्लंड यांच्यात सामना होत आहे. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. दोन सामन्यात पराभूत झाल्यामुळे भारतीय संघ गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. तर इंग्लंड तिसऱ्या स्थानावर आहे.

**//<><><><><>//**